नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०५/२०२५ (सोमवार)**

---

## पोलीस स्टेशन कुही मर्ग क्रं २४/२०२५

दिनांक १२/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कुही अंतर्गत पाचगाव चौकी येथे रफिक अन्सारी रा कुही फाटा यांनी माहीती दिली की, त्यांचा भाचा नामे एहतेशाम अन्सारी हा काल दिनांक दिनांक ११/५/२०२५ पासुन पोलीस स्टेशन तहसिल येथुन मिसींग असुन त्याचे मोबाईल चे लोकेशन गर्ग खदान, सुरगाव शिवार येथे दाखवत आहे.अशी माहीती मिळताच पाचगाव पोलीस चौकी येथील अंमलदार हे माहीती देणारे यांच्या सह तात्काळ गर्ग खदान, सुरगाव शिवार येथे गेले असता तेथे तलावाच्या बाजुला ५ जोड चप्पल व कपड्याची थैली पडुन दिसली.तसेच काही अंतरावर एक हिरोहोंडा पॅशन प्रो ही बाईक ठेवलेली दिसली.सदर बाबी संशयास्पद वाटल्याने पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली असता खदान तलावामध्ये दोन महीलांचे प्रेत पाण्यावर तरंगतांना दिसले. पोलीसांनी तात्काळ गोताखोंराना बोलावुन प्रेत बाहेर काढुन अजुन तलावात शोध घेतला असता अजुन तीन प्रेत १.एक तरूण मुलगा ,बालक आणि बालीका यांचे प्रेत मिळुन आले. **एकुण पाच प्रेत मृतक नामे .१) एहतेशाम मुक्तार अन्सारी वय २० वर्षे, रा तकीया दिवानशहा मोमीनपुरा नागपुर, २) रज्जु उर्फ रंजना सुर्यकांत राउत वय २२ वर्षे, डालडा कंपनी जवळ गुजरवाडी नागपुर, ३) सौ रोशनी चंद्रकांत चौधरी वय ३२ वर्षे, ४) मोहीत चंद्रकांत चौधरी वय १० वर्षे, ५) कुमारी लक्ष्मी चंद्रकांत चौधरी वय ८ वर्षे, तिन्ही रा–प्लॉट नं ७५ लक्ष्मी नगर, बारोडा रोड धुळे ,तह. जि. धुळे असे आहे.**

एहतेशाम मुक्तार अन्सारी याचे प्रेत रफिक अन्सारी यांनी ओळखले. मृतक क्र. २ ते ५ यांची प्रेत फिर्यादी यांनी ओळखले तसेच **फिर्यादी नामे सुर्यकांत जिवन राउत, डालडा कंपनी जवळ गुजरवाडी नागपुर यांनी माहीती दिली की, मृतक नामे एहतेशाम मुक्तार अन्सारी हा**

**त्यांची मृतक मुलगी नामे रज्जु उर्फ रंजना सुर्यकांत राउत हिचा मित्र होता.** मृतक क्रं २ ते ५ हे एकाच परीवारातील आहे. वरील सर्व प्रेतांचे पंचनामे करून त्यांचे शवविच्छेदन करण्यासाठी मेडीकल कॉलेज ,नागपुर येथे पाठविण्यात आले आहे. फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कुही येथे मर्ग दाखल करण्यात आला आहे. सदर मर्ग चा पुढील तपास कुही पोलीस करीत आहेत.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ४ लाख ५३ हजार ३७० रूपयांचा मुद्देमाल जप्त.

**पोलीस स्टेशन कुही** :– दिनांक ११/०५/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, चिकना शेत शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता काही इसम जुगार खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी चहु बाजुंनी सापळा रचुन धाड टाकली असता आरोपी नामे १) सचिन राधेश्याम शाहु, वय ३४ वर्ष, रा प्लॉट नं. ३४, इंगोले नगर ,हुडकेश्वर, नागपुर २)प्रमोद दुर्गाजी अहिरकर, वय ४४ वर्ष, रा प्लॉट नं. ५८ ,अयोघ्या राम मंदिर जवळ, नागपुर ३)राहुल अशोक ठाकरे ,वय ३४ वर्ष , रा मानेवाडा बाकडे सभागृहाच्या मागे, नागपुर ४)शंकर सुधाकर कोडे, वय २३ वर्ष, रा प्लॉट नं. १४१, इंगोले नगर ,हुडकेश्वर, नागपुर ५)गणेश अंकुश लांजेवार, वय ३६ वर्ष ,प्लॉट नं. १०९, न्यु नरसाळा, नागपुर ६) सुरज अनिल खडसे , वय २४ वर्ष ,इंगोले नगर हुडकेश्वर , नागपुर ७) अतुल दत्तुजी ठाकरे, वय ३९ वर्ष, प्लॉट नं. १२ ,पिपळा ,ग्रामपंचायत ,नागपुर ८) तेजस धनराज बुजाळे ,वय २४ वर्ष ,सालई, गोदनी,ता. जि. नागपुर ९)कार्तीक प्रमोदजी नारनवरे, वय २८ वर्ष, वार्ड क्र १२, आम्रपाली नगर, हुडकेश्वर रोड , नागपुर १०) जितेश उर्फे बबलु मधुकर फालेकर, वय ५४ वर्ष, प्लॉट नं. ३१ ,चंद्रकीरणे नगर, हुडकेश्वर , नागपुर ११)कार्तीक नानाजी येलेकर, वय २६ वर्ष, प्लॉट नं. ६९ ,पिपळा ,हुडकेश्वर रोड, नागपुर १२)लोकेश रमेशरा घुबळे, वय २८ वर्ष, प्लॉट नं. ८६, सरस्वती नगर ,दिघोरी नागपुर १३)देवराज बेनिराम बावनकर, वय २८ वर्ष, प्लॉट नं. ८१ कामगार कॉलनी, हुडकेश्वर रोड, नागपुर १४) साजन कुवरलाल लांजेवार,

वय ४१ वर्ष, प्लॉट नं. २६, न्यु हुडकेश्वर, पोलीस स्टेशन जवळ, नागपुर १५) आशिष अरविंदराव नासरे, वय २३ वर्ष , प्लॉट नं. ०४ , वकील पेठ, नागपुर हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते, ३,३७० /— रूपये रोख रक्कमेसह , १० दुचाकी वाहने असा एकुण कि ४,५३,३७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद १५ आरोपीतांविरूध्द कलम १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ५ आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्याता आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा:—** जलालखेडा पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी **नामे समिर मस्जीद मंसुरी, वय २१ वर्ष ,रा. जुनी वस्ती आमनेर ता. वरुड जि— अमरावती** हा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने त्याचेवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन खापा :— खापा पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी **नामे निखील राजेश कठौते , वय २४ वर्षे, रा.गुमगाव माईन ता.सावनेर** हा मौजा.गुमगाव माईन येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने त्याचेवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान:—** कन्हान पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी **नामे संजय रमेश दाशमेर, वय २९ वर्ष,रा.वार्ड नं.२ टागला, ता.रामटेक** हा शिवनगर शिवमंदीरा च्या बाजुला कांद्री अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने त्याचेवर कलम २७ एन.डी. पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन खापरखेडा:—** खापरखेडा पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना आरोपी **नामे १)राजेराम अंतुजी शिदे वय ६५ वर्ष रा. वार्ड क्र.४ भानेगाव २) दुर्गेश सुखदेवजी मोहबे वय**

**३५ वर्ष रा. वार्ड क्रमांक १ चिचोली** हे रेल्वे चौकी हनुमान मंदिर वॉर्ड नंबर एक खापरखेडा येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **आरोपी नामे उमेश गोवर्धन खातरकर वय ३३ वर्ष रा. हनुमान मंदिर वार्ड न ०६ चनकापूर** हा मौजा चनकापूर हनुमान मंदिर जवळ अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने त्यांचे वर त्याचेवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने